# वाहन खरेदी करीता कर्ज मंजुरीच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे

बॅकेमार्फत पगारदार कर्मचारी तसेच इतर गरजु सभासदांना खाजगी वापरासाठी नविन वाहन खरेदी करणे करीता धोरणाच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे.

**१) कर्जाकरीता पात्र सभासद :—**

शासकीय, निमशासकीय, शाळा, कॉलेज, बॅक तथा मार्केटींग फेडरेशनचे नियमीत व कायम कर्मचारी त्यांच्या पगारातुन सर्व प्रकारची कपात व सदर वाहन कर्जाच्या हफ्त्याची कपात वजा जाता कमीत कमी ४० टक्के पगार हाती मिळणे आवश्यक राहील. पगारदार कर्मचाऱ्यांचे तसेच वाहन कर्ज घेणारे इतर सभासदांचे सेव्हिंग/स्पेशल खाते असणे आवश्यक राहील असे सभासद पात्र राहतील.

**२) उद्देश :—**

नविन वाहन/ई.वाहन उदा. दुचाकी, तीनचाकी तसेच चारचाकी वाहना करीता कर्ज उपलब्ध करुन देणे.

**३) कर्ज मर्यादा :—**

कर्जाची मर्यादा रु. ५०००००/— राहील. सदर मर्यादेत रोड टॅक्स, रजिस्ट्रेशन, इन्शुरन्स इ. अनुषंगीक खर्चाचा समावेश राहील.

**४) कर्ज परतफेड :—**

- कर्जाचा परतफेड कालावधी जास्तीत जास्त ६० महिने (५ वर्ष) इतका राहील. कर्जाची परतफेड ठरवुन दिलेल्या मुदतीच्या आगोदर करावयाची झाल्यास शिल्लक कर्ज रक्कमेच्या ३ टक्के कमीटमेंट चार्ज अदा करुन तसे करता येईल.
- बॅकेच्या परवानगी शिवाय वाहण विकता येणार नाही.
- बॅकेच्या परवानगी शिवाय वाहण भाडयाने देता येणार नाही.
- सदर कर्जाच्या परतफेडीस दिलेल्या कालावधीपेक्षा जास्त सवलत मिळणार नाही.
- वाहन कर्जाच्या वसुलीकरीता कर्जदाराला बॅकेतील इतर ठेवीमधुन कर्ज वसुली देता येणार नाही. ठेवी वाटपाकरीता बॅकेचे प्रचलीत धोरण लागु राहील.

**५) स्वगुंतवणुक :—**

कर्जदार सभासदांची स्वगुंतवणुक कर्ज रक्कमेच्या चारचाकी प्रवासी वाहनाकरीता २५%, तीनचाकी प्रवासी वाहना करीता २०%, दुचाकी वाहना करीता १०%, तर तीनचाकी, चारचाकी मालवाहकांना २०% इतकी राहील. कर्जमंजुरी व स्वगुंतवणुक पेक्षा वाहनाची किंमत जास्त राहिल्यास, सदर फरकाची रक्कम कर्जदार सभासदांनी स्वत: वहन करावी. स्वगुंतवणुक, फरकाची रक्कमेचा भरणा प्रथम बॅकेत करावा.

**६) व्याजदर व वसुली :—**

सदर कर्जाचा व्याजदर १०% तर महिलांकरीता/शेतकऱ्यांकरीता (सातबाराधारक) ९% इतका राहील. व्याज आकारणी मासिक पध्दतीने करुन व्याजाची वसुली दर माह, मुद्दल कर्ज हफ्त्यासह नांवे टाकुन चेक व्दारे किंवा ECS प्रणालीव्दारे या त्याचा नगदीने भरणा करावा लागेल.

**७)** कर्जाच्या परतफेडीचा हप्ता ९१ दिवसात प्राप्त न झाल्यास / थकीत झाल्यास एकुण थकीत कर्जबाकी रक्कमेवर अतिरिक्त ३% दंड व्याजासह व्याज आकरण्यांत येईल.

**८) सेक्युरिटी :—**

कर्जाव्दारे खरेदी केलेले वाहन बॅकेला नजरगहाण (Hypothication) करुन देणे आवश्यक राहील. कर्जदार सभासदांचे कमीत कमी दोन महिन्याचे कर्ज हप्ते एवढी रक्कम बॅकेत कर्ज परतफेड कालावधी पर्यंत, बॅकेत मुदत ठेवीत / सेव्हिंग खात्यात गुंतविणे आवश्यक राहील. ती रक्कम बॅकेला लीन राहील. तसेच बिगर पगारदार गरजु कर्जदार सभासदानांनी कर्ज रक्कमेच्या दुप्पट किंमतीची स्थावर मालमत्ता (शेती वगळुन) बॅकेला रजिस्टर्ड गहाण करुन देणे आवश्यक राहील.

कर्जापोटी दोन पगारदार किंवा प्रतिष्ठित को—बारोअर, जमानतदार देणे आवश्यक राहील.

**९) कर्ज मंजुरी व वाटप :—**

सदर कर्ज मंजुरीचे अधिकार बॅकेचे प्रशासकीय मंडळ किवा त्यांनी अधिकार दिलेल्या कर्ज छाननी समितीला राहील. कर्ज छाननी समितीचे तपासणी अंती शिफारशीनुसार अंतिम मंजुरीचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहील.

शाखेकडुन बॅकेच्या ठराविक नमुना फार्म मध्ये अर्ज प्राप्त झाल्यानंतर मुख्यालया व्दारे रितसर तपासणी व कागदोपत्री पुर्तता पुर्ण करुन घेवुन, परिपुर्ण प्रस्ताव संचालक मंडळापुढे ठेवायचे आहे. अपरिपुर्ण प्रस्ताव संबधीत शाखेला परत करुन पुर्तता झाल्यानंतरच कर्ज प्रस्तावावर विचार करण्यांत येईल.

कर्ज मंजुर झाल्यानंतर कर्जाचा वाटप मुख्य कार्यालयाच्या परवानगीने शाखेमार्फत नियमानुसार करावयाचा आहे. तद्पुर्वी बॅकेमार्फत विमा कंपनीशी बॅक व कर्जदार सभासदाच्या संयुक्त नावाने कर्ज रक्कम व कर्ज परतफेड कालावधी पर्यंत इतका अपघात विमा काढुन करार करावा लागेल. कर्जाचा संपुर्ण रेकॉर्ड शाखा स्तरावर ठेवायचा आहे. कर्ज व स्वगुंतवणुकीच्या रक्कमेसह, संपुर्ण रक्कम चेक / डी.डी. व्दारे थेट वितरकास अदा करावा लागेल.

## कर्ज मागणी अर्जासोबत सादर करावयाचे कागदपत्रे

१. आधार कार्ड / पॅन कार्ड
२. वितरकाचे कोटेशन / प्रोफार्मा इन्व्हाईस, वाहन संबधी संपुर्ण तपशील व इतर खर्चाची संपुर्ण माहीती.
३. शासकीय रोड परमीटची आवश्यकता असल्यास त्याची प्रत.
३. नोकरदार सभासदाचे पगारपत्रक व नियुक्ती किंवा पगार देणाऱ्या सक्षम अधिकारी (ड्राईंग ॲन्ड डिस्बरसींग ॲथोरिटी ) चे पगारातुन कर्ज हप्ता कपात करुन देणेबाबतचे हमीपत्र.
४. इतर सभासदांकरीता घर किंवा तत्सम मालमत्तेच्या कागदपत्रांची सत्यांकीत प्रत, व्हॅलुएशन (अधिकृत व्हॅल्युअर) रिपोर्ट इत्यादी, उत्पन्नासंबधीचे व्यवसायीक विवरण.
५. मागील दोन वर्षाचे आयकर प्रमाणपत्र (बॅकेला आवश्यक असल्यास)

## कर्ज वाटप नंतर घ्यावयाचे कागदपत्रे व करावयाची कार्यवाही.

## बॅकेच्या आवश्यकतेनुसार खालील कागदपत्रांची पुर्तता करावी लागेल.

१. आर.टी.ओ. व्दारे रितसर बॅकेच्या बोझ्याची नोंद नोंदणी पुस्तिकेत (रजिस्ट्रेशन बुक) मध्ये करुन घेणे बंधनकारक आहे.
२. वाहन खरेदीची मुळ खरेदी रसीद घेणे.
३. वाहन डेलीव्हरी मेमो ची मुळ प्रत ग्राहकाच्या सही निशी घेणे.
४. वाहनाची डुप्लीकेट चावी घेणे.

५. बॅंकेच्या व कर्जदार सभासदाच्या संयुक्त नावाने कर्जपरतफेड कालावधीचे एकमुश्त कॉम्प्रीहेन्सीव्ह विमा पॉलीसीची मुळ प्रत.

६. आवश्यक असल्यास रुट परमीट व फीटनेस प्रमाणपत्राची प्रत घेणे.

७. रजिस्टर्ड गहाणखत करुन स्थावर मालमत्तेचे मुळ कागदपत्रे घेणे. (पगारदार कर्मचारी वगळुन)

८. को–बारोअर जमानदारांचे प्रतिज्ञापत्र व हमीपत्र रु. १००/– च्या स्टॅम्पपेपर वर घेणे.

९. खाजगी वापर ऐवजी इतर कार्याकरीता वापरत असलेल्या वाहनावर बॅंकेच्या नावासह, बॅंकेला नजरगहाण असल्याबाबतची प्रिंटेड नोंद वाहनाच्या दर्शनी भागात लावणे आवश्यक राहील.

१०. कोरे टी. ओ. (ट्रान्सफर ऑफ ओनरशीप) फार्म दोन प्रतीत वाहन खरेदी करणारेची (कर्जदार) सभासदांची सही घेणे व कर्ज प्रकरणासोबत ठेवणे.

११. प्रॉमेसरी नोट (वचन चिठ्ठ) करुन घेणे.

१२. सदर कर्जाकरीता क्रेडिट इन्फॉरमेशन कंपनीकडुन (CIBIL) रिपोर्ट घेणे आवश्यक असल्यामुळे अर्जदाराकडुन शाखेत कर्ज मागणीकरीता संपुर्ण कागदपत्रासह अर्ज सादर करतांना त्यांचेकडुन याकरीता रक्कम रुपये १००/– नगदीने जमा करावे लागेल.

## कर्जपरतफेड अनियीमत असल्यास किंवा थकल्यास शाखेने करावयाची कार्यवाही :–

कर्जपरतफेड मासिक स्वरुपात व्याजासह होणे आवश्यक राहील. कर्ज हफ्ता थकीत झाल्यास कर्जदार सभासद व जमानतदार यांना रजिस्टर्ड ए. डी. व्दारे मागणी नोटीस पाठवुन, येणारा खर्च सभासदाच्या नांवे टाकावे, कर्ज हफ्ता ८ दिवसांचे आत न भरल्यास वाहन जप्तीची सुचना नोटीस मध्ये नमुद असावी.

वाहन कर्ज थकीत झाल्यास व कायदेशीर कार्यवाही करणे जरुरी झाल्यास यावर येणारा संपुर्ण खर्च भरुन देणेस सभासद जबाबदार राहणार आहे.

## कर्जपुर्ण परतफेड झाल्यावर करावयाची कार्यवाही

कर्जाची संपुर्ण परतफेड झाल्यावर मुख्यालयाच्या परवानगीने, बॅंकेचा बोझा सक्षम अधिकाऱ्याच्या सहीने कमी करुन डुप्लीकेट चावी, इन्सुरेन्स पावती इत्यादी, सभासदांकडुन परत मिळाल्याची रितसर पावती घेवुन, परत करावे.

विमा पॉलीसी वरील बॅंकेचे हित सक्षम अधिकाऱ्याच्या सही निशी कमी करण्यांत यावा.

वरील धोरण व अटी व्यतिरिक्त आवश्यक वाटल्यास व बॅंकेचे हित लक्षात घेता जादाची अट घालण्याचे अधिकार बॅंकेच्या मुख्य कार्यालयास राहील.